**फौ.कि.अ.क्र.१९२/२०२६**
**गणेश दशरथ खांडेकर वि. सरकार**

MHSO160010272026

**निक्र.१ वरील आदेश**
**(पारित दिनांक ०९/०७/२०२६ )**

**१.** अर्जदाराने प्रस्तुत अर्ज अपराध क्र.५६५/२०२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १२(अ) प्रमाणे करमाळा पोलीस स्टेशन येथे अर्जदाराचा रियलमी कंपनीचा सी ७५ हा मोबाईल जप्त असुन तो सोडविण्याकरिता अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदाराने महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १२(अ) प्रमाणे आरोपी काशिनाथ अंकुश गायकवाड, यांचे विरूध्द करमाळा पोलीस स्टेशन येथे गु.र.न.५६५/२०२६ हा गुन्हा दाखल केलेला आहे ज्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

१. कंपनी – रियलमी
२. मॉडेल – सी ७५
३. इ.एम.इ.आय नं. – ८६०९८९०७३५९३५१२

सदर मोबाईल पोलीसांनी वरील गुन्हयात जप्त केलेले आहे.

**३.** अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार ही मौजे आवाटी, ता.करमाळा, जि.सोलापुर येथील कायमचा रहिवासी असुन अर्जदार हे त्यांचे संपुर्ण कुटूंबीयांसह सदर ठिकाणी राहत आहे. अर्जदाराच्या कथनानुसार अर्जदाराचा रियलमी कंपनीचा सी ७५ हा मोबाईल करमाळा पोलीस स्टेशनने जप्त केलेला आहे. अर्जदाराच्या कथनानुसार सदर मोबाईल अर्जदार यांनी त्यांचे नावे खरेदी घेतलेला होता. अर्जदार हे रियलमी कंपनीचा सी ७५ या मोबाईलचे कायदेशीर मालक आहेत.

४. अर्जदाराच्या कथनानुसार रियलमी कंपनीचा सी ७५ हा मोबाईल करमाळा पोलिस स्टेशन यांनी वरील गुन्हयामध्ये जप्त केल्यापासून अर्जदार यांना नातेवाईकांना संपर्क करण्यास बाधा होत आहे. अर्जदाराच्या कथनानुसार रियलमी कंपनीचा सी ७५ हा मोबाईल त्यांचे नातेवाईक यांच्या मदतीने उसनवार रक्कमा घेऊन खरेदी केलेला होता. अर्जदाराच्या कथनानुसार रियलमी कंपनीचा सी ७५ हा मोबाईल त्यांच्या ताब्यात न मिळाल्यास अर्जदार यांचा व्यवसाय, कामधंदा, नातेवाईकांशी असणारा संपर्क बंद होईल. अर्जदार यांना उसनवार रक्कमा फेडता येणार नाहीत. त्यामुळे अर्जदार यांचे अतोनात कधीही न भरून येणारे नुकसान होईल.

५. अर्जदाराच्या कथनानुसार सदर मोबाईल एकाच जागी पडून राहिला तर सदर मोबाईलची बॅटरी खराब होण्याची शक्यता आहे. अर्जदाराने त्याच्या अर्जामध्ये न्यायालय लादेल त्या अटी व शर्तीचे पालन करून तो जप्त मोबाईल परत मिळविण्यास विनंती केली.

६. सहाय्यक सरकारी वकिलांनी निशाणी ०४ वर त्यांचे म्हणणे सादर करून अर्जदाराला जर जप्त मोबाईल परत दिला तर ते अर्जदार विक्री, हस्तांतर करण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे तसेच सदर मोबाईल अर्जदार पुराव्याच्या वेळी हजर करणार याची शाश्वती नसल्यामुळे त्यांनी प्रस्तूत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

७. प्रस्तूत अर्जावर तपास अधिकारी यांनी निशाणी ०४ वर त्यांचे म्हणणे दाखल करून जप्त मोबाईल योग्य व अटी व शर्तीवर अर्जदारास परत करण्यास त्यांची हरकत नसल्याची नमूद केले.

८. अर्जदाराच्या अर्जाचे तसेच तपासी अधिकारी व सहाय्यक सरकारी वकीलांनी दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे श्री. ए.एच.पठाण वकील व

सरकार तर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. ए.एस. वाघमारे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच अर्जदाराने अर्जासोबत दाखल केलेल्या सर्व दस्तऐवजाचे अवलोकन केले.

९. फिर्यादी नामे गणेश दशरथ खांडेकर, रा.आवाटी, ता.करमाळा, जि.सोलापुर येथील कायमचे रहिवासी असुन अर्जदार हे त्यांचे संपुर्ण कुटूंबीयांसह सदर ठिकाणी राहत आहेत. फिर्यादीच्या कथनानुसार पोलीसांनी फिर्यादीच्या रियलमी सी ७५ हा मोबाईल महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १२(अ) प्रमाणे आरोपी काशिनाथ अंकुश गायकवाड, यांचे विरूद्ध करमाळा पोलीस स्टेशन येथे गु.र.न.५६५/२०२६ मध्ये जप्त केलेले आहे. सदर मोबाईलचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

१. कंपनी – रियलमी
२. मॉडेल – सी ७५
३. इ.एम.इ.आय नं. – ८६०९८९०७३५९३५१२

१०. अर्जदाराने अर्जासोबत दाखल केलेल्या मोरया मोबाईल शॉपी यांच्या पावतीवरून दिसून येते की, अर्जदार हे जप्त मोबाईलचे मालक आहेत. अर्जदारांने त्यांच्या आधार कार्डची प्रमाणपत्राची छायांकित प्रत मुळ वरून पडताळलेली निशाणी ३ च्या दस्तासोबत दाखल केलेली आहे. सदर मोबाईल अर्जदाराच्या मालकीचे असुन सदर मोबाईल पोलीस स्टेशनला पडुन राहिले तर ते खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मोबाईलचे खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जर अटी व शर्ती लागुन अर्जदाराला त्याच्या मालकीचे मोबाईल परत केला तर ते योग्य होईल. त्यामुळे प्रकरणाची वस्तुस्थिती लक्षात घेऊन मी पुढील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. तपास अधिकारी/पोलीस ठाणे अंमलदार, करमाळा पोलीस स्टेशन यांना

आदेशीत करण्यात येते की, गुरनं.५६५/२०२६ या गुन्हयात अर्जदाराच्या रियलमी सी ७५ हा मोबाईल रक्कम १२,५००/– रूपयाचा बंदपत्र घेऊन अर्जदाराला परत करावा.

३. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, सदर मोबाईल परत करण्याआधी त्याने १२,५००/– रूपयाचे हमीपत्र न्यायालयात दाखल करावे.

४. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, ते सदर मोबाईल इतर कोणाला देणार नाही किंवा ते कोणालाही केसचा निकाल लागेपर्यंत न्यायालयाच्या परवानगी शिवाय विकणार नाही.

५. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, त्याने जप्त मोबाईल यांचे मागून पुढून दोन फोटो अभिलेखावर दाखल करावे. जेणेकरून पुराव्याच्या वेळी सदर फोटोग्राफवरून मोबाईलची ओळख होवू शकेल. तसेच तपास अधिकारी यांनी अर्जदाराला जप्त मोबाईलचे फोटो घेण्यास सहकार्य करावे.

६. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, न्यायालय सांगेल किंवा तपास अधिकारी सांगेल त्यावेळी रियलमी कंपनीचा सी ७५ हा मोबाईल न्यायालयासमक्ष हजर करावा.

७. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, त्याने जप्त मोबाईलच्या स्वरूपात कोणताही बदल करू नये.

AMIT KISHORE SHARMA

Digitally signed by AMIT KISHORE SHARMA
Date: 2026.07.09 17:18:26 +0530

दि.०९/०७/२०२६ (अमित.कि.शर्मा)

करमाळा न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, करमाळा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original Judgment

(a) Name of the Stenographer :- Rutuja D. Gore
(b) Court :- CJJD & JMFC, Karmala
(c) Judgment signed by P.O.on :- 09/07/2026
(d) Judgment uploaded on :- 09/07/2026